CNR: MHSI05-000269-2015

**<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. ४६/२०१५ मधील निशाण नं. ४७ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १, २अ, २ब व ३ यांचे तर्फे त्यांचे विरुध्द विना कैफियत आदेश रद्द बातल करुन त्यांची कैफियत दाव्याचे कामी सामिल करण्यासाठी दाखल करण्यात आलेली आहे.

२. त्यांनी असे नमुद केले आहे की त्यांची कैफियत सादर करण्यासाठी दाव्यातील मिळकतीबाबतचे महसुल दप्तरातून, दुयम निबंधक कार्यालयातून तसेच न्यायालयीन अभिलेखातुन कागदपत्र प्राप्त करुन घेण्यास बराच कालावधी लागला. त्यामुळे त्यांना वेळीच कैफियत दाखल करता आली नाही. त्यांची कैफियत दाव्यामध्ये सादर करुन घेतली नाही तर दावा मिळकतीतील त्यांच्या हक्कस्थापनेस बाधा येईल आणि त्यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणार नाही. त्यामुळे कब्जा वहिवाटीपासून ते वंचीत राहतील. तसेच प्रतिवादीचे पैशाचे रुपाने भरुन न येणारे नुकसान होईल. म्हणुन त्यांचा अर्ज मंजूर करुन त्यांची कैफियत दाव्याचे कामी सामिल करुन घ्यावी अशी त्यांनी मागणी केली आहे.

३. या अर्जास वादीच्या वकिलांनी कडाडुन विरोध केलेला असुन प्रतिवादींना प्रदीर्घ मुदत मिळुनही त्यांनी कैफियत सादर केली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच अर्जात दिलेले कारण अत्यंत त्रोटक व मोघम आहे. प्रतिवादींनी मागणी केलेल्या कागदांचा कोणताही उल्लेख अगर पुरावा सादर केलेला नाही. सबब त्यांचा अर्ज नामंजूर करावा असे त्यांनी नमुद केले आहे.

४. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. एकंदरीत परिस्थिती पाहता १ वर्षापेक्षा जास्त कालावधी पूर्वी प्रतिवादी विरुध्द विना कैफियत आदेश झालेला आहे. सदर प्रतिवादींनी कैफियत देण्यासाठी बराचसा कालावधी व वेळ देण्यात आलेला आहे. मात्र याचवेळेस दाव्याचे गुणदोषावर निकाल होण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्व विचारात घेता प्रतिवादींना त्यांची बाजु मांडायला देणे तितकेच महत्वाचे आहे. सबब न्यायाचा समतोल राखण्यासाठी प्रतिवादीकडून जो काही विलंब झाला आहे त्याबाबतचा दंड त्यांचेवर लादून तो दंड वादीला देणे उचित राहाणार आहे. सबब मी खालील आदेश पारित करतो.

१. प्रतिवादी अर्ज एकुण रक्कम रुपये २,०००/— वादीला देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. त्यांनी सदर आदेशाची पुर्तता केल्यावर त्यांचे विरुध्दचा विना कैफियत आदेश रद्द बातल करुन त्यांची कैफियत दाव्यामध्ये सामिल करुन घेण्यात येईल.

सही/—

(वि.द.पाटील)

दिनांक— १४/०२/२०१८ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.